ePaper
| वर्ष - 6 | अंक - 113 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार | दिनांक 28 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शिवसेना खासदाराच्या घरात फूट, मोठा भाऊ शिंदे गटात, धाकटा ठाकरेंसोबत



## आतील पानांत


- सुवर्ण महोत्सवी वनवासी विद्यार्थी वसतीगृहाला 'एक हात मदतीचा'
- वादग्रस्त नोटीस अखेर रद्द!
- पोलीस गृहनिर्माण योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही




राज्य सरकारने हळदीच्या संदर्भात जो निर्णय घेतला आहे, तो निर्णय महाविकास आघाडी सरकारने अर्थसंकल्पात घेतला होता. या सरकारने फक्त त्याला मान्यता दिली. याचबरोबर नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५० हजारापर्यंत अनुदान देण्याचा निर्णयही आमच्या सरकारने घेतला होता. तो निर्णय या सरकारने पुन्हा घेतला.

- अजित पवार, राष्ट्रवादी नेते

कॅलेंडरचं पान उलटण्यापूर्वीच राज्याला नवीन मंत्रिमंडळ मिळायला हवं. येत्या चार दिवसात जुलै महिना संपत आहे. त्यामुळे ३१ जुलैच्या आधी कॅबिनेट विस्ताराला मुहूर्त मिळण्याची चिन्हं आहेत. आज आषाढी अमावस्या आहे. त्यामुळे श्रावणातच मंत्रिमंडळाला नवी पालवी फुटणार, असं दिसत आहे. आज आणि उद्या राज्यपाल भगतसिंह कोश्यारीही दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यामुळे ३० किंवा ३१ जुलैला हा विस्तार होण्याची शक्यता आहे.

- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री.



### वैभवशाली परंपरा असलेला गणेशोत्सव यंदा करोनाच्या 2 वर्षांच्या निर्बंधानंतर उत्साहात होणार साजरा

# गणेशोत्सवासाठी पोलिसांची नियमावली जाहीर!

### बॉक्स कमानी, ध्वनिवर्धकाचे निर्बंध कायम, मंडळांसाठी एक खिडकी योजना यंदाही



**पुणे । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**वैभवशाली** परंपरा असलेला गणेशोत्सव यंदा करोनाच्या दोन वर्षांच्या निर्बंधानंतर उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. पोलिसांकडून उत्सवासाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयात पार पडलेल्या बैठकीत मंडळाच्या कार्यकर्त्यांशी पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. उत्सव शांततेत तसेच उत्साहात पार पाडण्यासाठी पोलिसांनी नियमावली केली असून मंडळांना देण्यात येणाऱ्यापरवान्यांसाठी विविध पोलीस ठाण्यात एक खिडकी योजना राबविण्यात येणार आहे. गेले दोन वर्ष उत्सवावर करोना संसर्गामुळे निर्बंध होते. संसर्गाला अटकाव घालण्यासाठी घालण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करुन उत्सव साजरा करण्यात आला होता. यंदाचा उत्सव जल्लोषात साजरा करण्याचा निर्णय मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घेतला असून त्यादृष्टीने कार्यकर्त्यांनी तयारी सुरू केली आहे. पोलीस आयुक्तालयात बुधवारी मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले. पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त आयुक्त डॉ. जालिंदर सुपेकर, रामनाथ पोकळे, राजेंद्र डहाळे, नामदेव चव्हाण आदी यावेळी उपस्थित होते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, सुनील रासने, श्री तांबडी जोगेश्वरी मंडळाचे प्रसाद कुलकर्णी, श्री गुरूजी तालीम मंडळाचे प्रवीण परदेशी, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे विकास पवार, नितीन पंडीत, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टचे कार्याध्यक्ष पुनीत बालन तसेच धीरज घाटे, भाऊ करपे, प्रमोद कोंढरे, ऋग्वेद निरगुडकर, सुनील पांडे, विश्वास भोर, बाळासाहेब मारणे, भूषण पंड्या आदी उपस्थित होते. या बैठकीत पोलिसांनी मंडळांना उत्सव शांततेत तसेच नियमांचे पालन करुन साजरा करण्याचे आवाहन केले. मंडळांसाठी तयार करण्यात आलेली नियमावली जाहीर करण्यात आली. मंडळांच्या कार्यकर्त्यांनी सूचना मांडल्या. मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या मागणीवर पोलिसांकडून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन पोलीस आयुक्त गुप्ता यांनी केले.

#### चार दिवस रात्री बारापर्यंत ध्वनिवर्धक

मंडळांनी उत्सवाच्या कालावधीत ध्वनिवर्धकाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नियमावलींचे पालन करणे गरजेचे आहे. ध्वनिवर्धकाचा आवाज मर्यादित असावा. उत्सवाच्या कालवधीत ४ सप्टेंबर (गौरी पूजन), ६ सप्टेंबर (सातवा दिवस), ८ सप्टेंबर (नववा दिवस) तसेच ९ सप्टेंबर रोजी अनंत चर्तुदशीच्या दिवशी रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनीवर्धकास परवानगी देण्यात आली आहे.

#### सुरक्षाविषयक नियमांचे पालन बंधनकारक

उत्सवाच्या कालावधीत राज्य तसेच परराज्यातून मोठ्या संख्येने भाविक येतात. मंडपाच्या परिसरात कार्यकर्त्यांनी सुरक्षाविषयक उपाययोजना करणे गरजेचे आहे. मंडपाच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. संशयास्पद व्यक्ती तसेच बेवारस वस्तू आढळल्यास त्वरीत पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिकांना त्वरीत मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

#### प्रत्येक मंडळाला दोन कमानींची परवानगी

मंडळांना कमानींवर लावण्यात येणाऱ्या जाहीरातीतून उत्पन्न मिळते. प्रत्येक मंडळांना दोन बॉक्स कमानी उभारता येईल. बॉक्स कमानींची उंची २० फुटापेक्षा जास्त नसावी. मंडपापासून शंभर फुटांच्या आत कमानी असाव्यात तसेच कमानींचा जमिनीपासून दहा फुटापर्यंतचा भाग खुला असावा. सुरक्षेसाठी पोलिसांकडून कमानींची तपासणी करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील धोकादायक अपुणे 'स्मार्ट सिटी'तील नागरिकांचे आरोग्य 'खड्डया'त

### राज्य सरकारची मान्यता; दरडप्रवण गावांचे खासगी जागांवर पुनर्वसन केले जाणार आहे

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

घर ते ऑफिस हे साधारणपणे १५ किलोमीटरचे अंतर. 'फील्ड जॉब' असल्याने अर्धा दिवस गाडीवरचा प्रवास. रस्त्यांवरील खड्डे खाचखळगे चुकवताना होणारी कसरत.



याचाच परिणाम म्हणून अचानक खांदे आणि हातांमधून मुंग्या येत असल्याचे निमित्त झाले. सलग पंधरा दिवस हा त्रास होत असल्याने अस्थिरोगतज्ज्ञांचा सल्ला घेतला, तपासणीअंती मणक्यांमध्ये गॅप पडल्याचे, मानदुखीचे निदान झाले. हे झाले प्रातिनिधिक उदाहरण!

मात्र, आठवडाभर पडलेल्या पावसाने शहरातील रस्त्यांची शब्दशः चाळण झाली आहे आणि त्यातून वाहने चालवताना मानदुखी, पाठदुखी पुणेकरांच्या पाचवीला पुजू लागली आहे. शहरातील रस्त्यांवर असलेल्या हजारो खड्यांमुळे पुणेकरांचे आरोग्यही खट्ट्यात चालल्याची संतप्त भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. खड्डेमय रस्ते आणि वाहतूक कोंडीतून वाट काढताना आरोग्याचे तीनतेरा वाजले आहेत.

पावसाचे पाणी साचल्याने वाहन चालवताना खड्डे पटकन दिसत नाहीत आणि गाडी आपटून दुखापत होते. खट्टे, खाचखळग्यांमधून वाहन चालविताना स्नायू दुखावल्यामुळे आणि मणक्याच्या विकारामुळे मानदुखी, पाठदुखी उद्भवत आहे. दुखणे वाढल्यामुळे डॉक्टरांकडे जाणाऱ्या रुग्णांची संख्याही वाढली आहे, असे निरीक्षण जनरल फिजिशियन डॉ. रोहित औटी यांनी नोंदवले.

### भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या उपक्रमाचे कौतूक

# सुवर्ण महोत्सवी वनवासी विद्यार्थी वसतीगृहाला ‘एक हात मदतीचा’!

## इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामाला मदत करणार

**। पुणे। महाईन्यूज ।**

**पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील दुर्गम भागात वनवासी बांधवाच्या वाड्या , वस्त्या आहेत .तेथील मुलांची शिक्षणाची सोय व्हावी या करिता सुरू केलेल्या वनवासी विद्यार्थी वसतीगृहातील इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी मदत करण्याचा संकल्प भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केला आहे.**



विश्व हिंदू परिषदचे कार्यकर्ते डॉ. दीक्षित यांनी १९७१ साली वाडा , ता.खेड याठिकाणी वसतिगृह सुरू केले. त्यानंतर वाडा गाव धरणक्षेत्रात गेल्याने वसतिगृहाचे राजगुरूनगर येथे स्थलांतर करण्यात आले. येथील तात्या खेडकर यांनी नदी काठच्या राम मंदिराची जागा वसतीगृहासाठी उपलब्ध करून दिली. परंतु, त्या ठिकाणी मुलांची निवास परिस्थिती तसेच पुराच्या पाण्याची भीती याकरिता संस्थेने राजगुरूनगर येथे वाडा रोड ला १२ गुंठे जागा घेऊन सुसज्ज इमारत उभी केली. सध्या २००९ पासून वसतिगृह याठिकाणी सुरू आहे, अशी माहिती वसतिगृहाचे अधीक्षक अमोल डमरे यांनी दिली.

दरम्यान, देशाच्या राष्ट्रपतीपदी पहिल्या आदिवासी महिला म्हणून श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी शपथ घेतली. तसेच, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून जीवनावश्यक वस्तू आणि शालेयपयोगी साहित्याची मदत करण्यात आली. तसेच, आगामी काळात इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करण्यासाठी मदत करण्याचा संकल्प आमदार महेश लांडगे यांनी केला. त्यामुळे संस्थेच्या कामाला आणखी गती मिळेल, असा विश्वासही अधीक्षक डमरे यांनी व्यक्त केला.



### आदिवासी विद्यार्थ्यांची मोफत सुविधा...

सध्यस्थितीला वसतिगृहात इयत्ता ५ वी ते १० पर्यंत चे एकूण ५० मुले शिक्षण घेत आहेत . या भागातील वनवासी मुले सुशिक्षित , सुसंस्कृत नागरिक व्हावीत हाच वसतीगृह सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश होता. हे वसतिगृह नसून हे एक हिंदू जीवन पद्धतीचे यथार्थ दर्शन घडवणारे गुरुकुल आहे. या ठिकाणी विध्यार्थ्यांना ज्ञानार्जना बरोबरच उत्तम संस्कार, योगासने, प्राणायाम, संगणक शिक्षण दिले जाते. मुलांना सर्व गोष्टी मोफत पुरवल्या जातात. वसतीगृहात वेगवेगळे सण समारंभ साजरे केले जातात. या बरोबरच मुलांना क्रांतिकारक, समाजसुधारक यांची चरित्रे सांगीतली जातात. वसतीगृहात विद्यार्थ्यांचा निकाल दरवर्षी १००टक्के असतो. तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अभ्यासाबरोबरच योगा व प्राणायाम शिकवले जाते.

### राज्यशासन स्तरावर मदतीची अपेक्षा...

सन १९७१ साली सुरू केलेला हा सामाजिक प्रकल्प पुणे जिल्ह्यातील आदर्श प्रकल्प म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक शासकीय अधिकारी आपले वसतीगृह (मॉडेल वसतीगृह) म्हणून दाखवण्यासाठी अनेक मान्यवरांना घेऊन येत असतात. सर्व ट्रस्टी हे सामाजिक बांधिलकी म्हणून येथे कार्य करतात. कोणताही मोबदला ट्रस्टी घेत नाहीत. मात्र, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून पोषण आहाराव्यतिरिक्त कोणतीही मदत राज्य सरकारकडून होत नाही. वंचित, शोषित आणि दुर्लक्षीत आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या कार्यात योगदान देणारी ही अनेकांच्या सढळ मदतीने हा वृक्ष दिमाखात उभा आहे. आपणही या कार्यास हातभार लावावा. त्यासाठी वसतिगृहाचे अधीक्षक अमोल डमरे यांच्याशी 94221995881संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वादग्रस्त नोटीस अखेर रद्द!

## टाटा मोटर्सला दिलासा : 'त्या' अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।




औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवड शहराचे भूषण असलेल्या टाटा मोटर्स कंपनीवर महापालिका कर संकलन विभागाने काढलेली वादग्रस्त नोटीस अखेर प्रशासनाने रद्द केली. भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांच्या लढ्याला यश मिळाले असून, तत्कालीन अधिकारी स्मीता झगडे यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महापालिका कर संकलन विभागाच्या तत्कालीन अधिकारी स्मीता झगडे यांनी नोंदणी न करता मिळकत उभारल्याचे कारण देत २५९ कोटी रुपयांची नोटीस पाठवली होती. वास्तविक, हजारो कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या या कंपनीला नोटीस पाठवून प्रशासनाने एकप्रकारे स्टंटबाजी केली होती.

याविरोधात तत्कालीन सत्ताधारी पक्षातील भाजपाचे नगरसेवक विकास डोळस आणि सहकाऱ्यांनी याविरोधात आवाज उठवला. महापालिका सर्वसाधारण सभेत निदर्शने करण्यात आली. मात्र, प्रशासनाने आपली भूमिका ठाम ठेवली होती. पिंपरी-चिंचवड खेडेगाव होते. तेव्हापासून पिंपरी-चिंचवडमध्ये टाटा मोटर्स ही कंपनी कार्यरत आहे. आता पिंपरी-चिंचवड नगरी ही देशात नव्हे, तर जगात उद्योग नगरी म्हणून प्रसिद्ध आहे. १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली व यशवंतराव चव्हाण साहेब यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली. त्याच वेळेस त्यांनी महाराष्ट्रात उद्योग उभारणीस सुरुवात केली.

सध्या महापालिका कार्यक्षेत्रात लहान मोठे असे जवळपास १२ ते १५ हजार उद्योग सुरु आहेत. यातील जवळपास ६० टक्के उद्योग हे टाटा मोटर्सवर अवलंबून आहेत. या लघु व मध्यम उद्योगात लाखोंनी कामगार काम करत आहेत. टाटा मोटर्समध्ये देखील सध्या सुमारे २० हजार कामगार काम करत आहेत.

विकास डोळस म्हणाले की, उद्योग क्षेत्रात टाटा मोटर्सचे सर्वेसर्वा रतन टाटा यांना आदराचे स्थान आहे. कोविड महामारी असो किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे संकट भारत देशावर किंवा महाराष्ट्र राज्यावर आले, तर प्रथम मदत ही टाटा कंपनीकडून भारत सरकार किंवा महाराष्ट्र सरकारला दिली जाते. याचे भान करसंकलन विभागातील अधिकाऱ्यांनी ठेवले नाही. केवळ आत्मप्रौढी मिरवण्यासाठी केलेली कारवाई जगजाहीर करणे आणि प्रसारमाध्यमातून बडेजाव करणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला शोभणारे नाही. याची योग्य ती चौकशी करून ही नोटीस पाठविणाऱ्या करसंकलन विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून नोटीस तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी आमची मागणी होती. त्याला आता यश मिळाले आहे.

१९६६ सालापासून टेल्को कंपनी शहरात काम करीत आहे. वाढीव आणि नवीन बांधकामासाठी कर आकरणी होणे अपेक्षीत आहे. मात्र, पूर्वी केलेल्या बांधकामावर एकदा कर आकारणी केल्यानंतर पुन्हा कर आकारणी योग्य होणार नाही. संबंधित नोटीस तांत्रिकदृष्टया योग्य नव्हती, असे निरीक्षण प्रशासनाने नोंदवले आहे. राज्यातील सत्ता बदल झाल्यानंतर प्रशासनाची भूमिकाही बदलली का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

### स्मीता झगडे यांना राज्य सेवेत परत घ्या...

वास्तविक, महाविकास आघाडी सरकारच्या काळात शहराला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. संबंधित अधिकारी हे राजकीय दबावाखाली काम करीत होते. त्यामुळे टाटा मोटर्स आणि पद्मश्री गिरीश प्रभूणे यांच्या समरसता पुररुत्थान गुरूकुलम सारख्या संस्थांवर कारवाईची नोटीस काढून स्टंटबाजी करण्यात आली. केवळ राजकीय हेतून शहराचे भूषण असलेल्या संस्थांना वेठीस धरण्याची भूमिका घेण्यात आली. त्यामुळे वादग्रस्त अधिकारी स्मीता झगडे यांना राज्य शासनाच्या सेवेत परत घ्यावे. यासाठी आम्ही भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्याकडे मागणी करणार आहोत. त्याद्वारे राज्य सरकारकडे तक्रार करण्यात येणार आहे, असेही माजी नगरसेवक विकास डोळस यांनी म्हटले आहे.

> **"सर्व तांत्रिक बाबी तपासून, प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्यानंतर पहिली नोटीस रद्द केली आहे आणि त्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन सुधारित नोटीस देण्यात आली. सुधारित नोटीस टाटा उद्योगसमूहाने मान्य केली आहे."**
> **- निलेश देशमुख, सहायक आयुक्त, कर संकलन विभाग.**

# 'पिंपरी पालिका आयुक्तांचा हुकुमशाही पध्दतीने प्रशासकीय कारभार'

## शालेय साहित्यवाटपास विलंब, वैद्यकीय शुल्कवाढप्रकरणी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी पालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दिले जाणारे शैक्षणिक साहित्य दीड महिने उलटून गेले तरी अद्याप देण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे, पालिका रूग्णालयांमधील उपचार व सुविधा शुल्क रकमेत मोठी वाढ करण्यात आली, याविषयी पिंपरीतील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे.

पिंपरी-चिंचवड शहर नागरी समस्या निवारण समितीच्या माध्यमातून एक निवेदन मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे. आयुक्त राजेश पाटील यांनी लोकनियुक्त सभागृह अस्तित्वात नसताना प्रशासक म्हणून मनमानी व हुकूमशाही पद्धतीने कारभार चालवला आहे. महापालिकेचे ८ रुग्णालये व २९ दवाखान्याच्या औषध उपचाराच्या दरात मोठी दरवाढ केली आहे. करोना, टाळेबंदी, महागाई, बेरोजगारीमुळे आधीच सामान्य जनता त्रस्त आहे. त्यात ही वाढ अन्यायकारक आहे. झोपडपट्टीतील नागरिक, कामगार, मजूर, गरीब पालिका रूग्णालयात उपचार घेतात. त्यामुळे प्रशासकांच्या मनमानी निर्णयाला स्थगिती द्यावी, अशी मागणी समितीने केली आहे.

पालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणारे शालेय साहित्य टक्केवारीच्या राजकारणामुळे अडकून पडले आहे. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळत नाही, याला पालिकेचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार आहेत. हे साहित्यवाटप तातडीने करण्याचे आदेश आयुक्तांनी द्यावेत, असे या समितीचे समन्वयक मारूती भापकर यांनी म्हटले आहे.

### पालिकेसमोर सर्वपक्षीय आंदोलन करणार

या दोन्ही मागण्याबाबत शहरातील राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या वतीने गुरुवारी (२८ जुलै) पिंपरी पालिकेच्या मुख्यालयासमोर जनआंदोलन करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहर नागरी समस्या निवारण समितीच्या माध्यमातून हे आंदोलन होणार आहे, असे मारुती भापकर यांनी सांगितले.



## संपादकीय »

# महामहिम : द्रौपदी मुर्मू!

***आजवर देशभरात सर्वाधिक वंचित राहिलेल्या आदिवासी जमातीतील महिला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना देशाच्या सर्वोच्चपदी विराजमान व्हावी, हा एक चांगला योग म्हणायला हवा.***

शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्याही वंचित समाजातून स्वकर्तृत्वावर पुढे येत, वैयक्तिक आयुष्यातील अनेक संकटांच्या मालिका पार करत राष्ट्रपतीपदापर्यंतचा मुर्मू यांचा प्रवास लक्षणीय आहे. शिक्षणाची ओढ माध्यमिक शाळेतही एवढी विलक्षण होती की, केवळ त्यासाठी दळणवळणाची फारशी साधने नसतानाही वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी दूर भुवनेश्वरला दररोज जाण्याचे कष्ट घेणे पसंत केले. ही ओढ आणि ते शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या मनात कांकणभर अधिकच ठसलेले दिसते. शिक्षणाप्रति असलेल्या निष्ठेमुळेच पुढे २०१६ साली त्यांनी स्वत:ची गावातील मालमत्ता आदिवासी मुलांच्या निवासी शिक्षण संस्थेसाठी दान केली. आजही आदिवासी समाजातून शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्यांच्या संख्येपेक्षा शाळागळतीची संख्या अधिक असते. तर उच्च शिक्षणाकडे जाणाऱ्यांची संख्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षाही कमी म्हणजेच केवळ ५.६ टक्के आहे. या परिस्थितीत १३ व्या वर्षीही शिक्षणासाठी दूर जाणे पसंत करणाऱ्या आणि आज राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचणाऱ्या मुर्मू समाजातील अनेकांसाठी आदर्श आहेत. आयुष्यात केवळ पाच वर्षांत दोन मुलगे आणि पती यांच्या अचानक निधनाचा डोंगर अंगावर कोसळल्यानंतरही न डगमगता वैयक्तिक आयुष्यात उभ्या राहणाऱ्या मुर्मू सार्वजनिक आयुष्यातही प्रेरणादायी आहेत. राष्ट्रपती म्हणजे केवळ नामधारीच अशी टीका सर्वत्र होत असताना तत्कालीन राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी एक वेगळा आदर्श देशवासीयांसमोर ठेवला होता. आता मुर्मू यांच्या निमित्ताने पुन्हा एकदा वंचित समाजातून स्वकष्टाने इथवर पोहोचण्याचा प्रेरणादायी आदर्श देशासमोर राहावा, अशी अपेक्षा आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये ८.७ टक्के आदिवासी आहेत. जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी त्यांना विशिष्ट अंतरावरच ठेवण्यात धन्यता मानली. तर अनेकदा स्थानिक प्रशासन आणि नक्षली यांच्यामध्ये त्यांची मुस्कटदाबीही झाली. शासकीय योजना आल्या पण अनेकविध कारणांनी त्या त्यांच्यापर्यंत कधी धड पोहोचल्याच नाहीत. सर्व बाजूंनी या समाजाचे शोषणच अधिक, कधी ठेकेदार, कधी सरकार, तर कधी नक्षली शोषणकर्ते वेगळे होते, इतकेच. या पार्श्वभूमीवर, २४ तास फक्त आणि फक्त राजकारणच करणाऱ्या भाजपने या राष्ट्रपती निवडणुकीच्या निमित्ताने ही संधी साधली आणि मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, झारखंड, ओदिशा, महाराष्ट्र या राज्यांतील आदिवासी मतदारांच्या बांधणीकडे मोहरा वळवला. शिवाय मोठ्या प्रमाणावर आदिवासी जनजाती असलेल्या ईशान्येतील राज्यांकडेही त्यांचे लक्ष आहेच.



## आनंदी सकाळ

# जिज्ञासूंच्या अभ्यासाचा सुंदर विषय

सर्वस्व समर्पणाने लोककल्याण, वैदिक धर्माचा उत्कर्ष, धर्म-विज्ञान, अध्यात्म-जीवन यांची परस्पर एकरूपता, जनसामान्यात ज्ञानाचा प्रसार व मूल्य जाणिवांचा विकास, लोपलेल्या उदात्त परंपरा, संस्कृतीचे काळानुरूप नवे आचार, भारतीय माणसातली दबलेली शौर्य भावना, अस्मिता व राष्ट्रीयतेची उन्मेष, बंद पडलेले कारखाने पुन्हा सुरू करणे, तंत्र-मंत्राच्या ओंगळ पसाऱ्याला काबूत आणून जरब बसवणे, प्रपंच अध्यात्ममय करुन समृद्ध व्यक्तिमत्वाची पिढी घडवणे, शेतकऱ्यांना अध्यात्माचा आधार देऊन संतांचे स्वप्न व कार्य पूर्ण करणे, ढासळलेली कुटुंबव्यवस्था पुन्हा मजबूत व निष्ठावान करणे, दु:खितांना उपाय देऊन जीवनात उभे करणे, सकारात्मक बनवणे, बहुजन समाजाला वैदिक ज्ञानपरंपरेची योग्य मीमांसा करून सोप्या भाषेत ते उपलब्ध करुन देणे, युवा पिढीला रोजगाराच्या नव्या दिशा देणे, शासनाला जनहितासाठी कृतिशील करणे... अशी एका ना अनेक उज्ज्वल कार्ये प्रत्येकक्षणी दादांनी केली.

# काय सरकार, काय कारभार! सगळं ओके हाय....



## भूमिका



महाराष्ट्राच्या राष्ट्रीय रंगमंचावरील महानाट्यानंतर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून रोजी शपथ घेतली. राज्याला नवे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री मिळून २७ दिवस झाले; मात्र अजून तरी नवे मंत्रीमंडळ मिळण्याचा योग नाही. तो केव्हा येणार आहे, हे कळायला काही मार्ग नाही. अहोरात्र काम करणारी सुपर-कार्यक्षम जोडी असताना इतर मंत्र्यांची गरज तरी आहे का, असाही प्रश्न काहींना पडत असेल; मात्र सुरत, गुवाहाटी, गोवा असे जंगी पर्यटन केलेले शिवसेना व मित्रपक्षांचे ५० आमदार आणि अडीच वर्षे महाविकास आघाडी सरकारच्या गच्छन्तीसाठी मनोमन देव पाण्यात बुडवून बसलेले भारतीय जनता पक्षाचे शंभरावर आमदार यांच्यातील नेमक्या कुणाला लॉटरी लागणार आहे, याची उत्सुकता ताणताणून आता ढिली पडली आहे. कदाचित, लवकर शपथविधी न करण्याचे तेही एक कारण असू शकेल. जितका काळ जाईल, तितका इच्छुकांचा धीर सुटू लागेल. त्यांचा टिपेचा आवाज खाली येईल आणि नेत्यांकडे आशाळभूतपणे पाहत राहण्यावाचून त्यांच्या हातात काही उरणार नाही. नुकतीच पनवेल येथे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक झाली. तेथे 'माझ्या मना बन दगड' अशी द्रष्टी काव्यरचना करणाऱ्या विंदा करंदीकर यांचे स्मरण प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी महाराष्ट्राला घडविले असले, तरी तिथला फडणवीस यांचा साखरेच्या पाकातला इशारा महत्त्वाचा होता. 'आपल्याकडे खूप गुणी माणसे आहेत; पण सगळ्यांना हवी ती संधी कशी मिळणार...' या अर्थाचे त्यांचे वाक्य सर्वच स्तरावरील इच्छुकांना 'मनोरथांचे घोडे फार दौडवू नका' हे सांगण्यासाठी होते. मंत्रीपद, ते गेले तर महामंडळ, तेही गेले तर विविध संस्था, देवस्थानांचे ट्रस्ट, बँका, नाहीतर शेवटी पुढचे आश्वासन अशी एकंदरीत उतरती भाजणी असते. याशिवाय, ठाकरे सरकार पडेपर्यंत राज्यपालांनी जिवाच्या कराराने थोपवलेल्या विधान परिषदेच्या १२ रिक्त जागा आहेतच. भाजप व शिंदे गट यांना तेही वाटप गुण्यागोविंदाने करावे लागेल, तरच महाराष्ट्राला परिषदेत नामांकित लेखक, कलावंत, विचारवंत मिळतील.

देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी परस्परांना पहाटे पहाटे जी गळामिठी घातली होती, ती फार लवकर सैल झाली. तेव्हा ते मंत्रीमंडळ औट घटकेचे ठरले होते. आता तशी अस्थिरता नाही. उलट, सारे इच्छुक 'घटका गेली, पळे गेली, तास वाजे झणाणा...' म्हणत दिवस मोजत आहेत. शिवसेनेतील ऐतिहासिक फुटीमुळे तीन पातळ्यांवर संघर्ष उभा राहिला आहे. निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि विधीमंडळ व संसद या त्या तीन पातळ्या आहेत.

# भिमा कोरेगाव - डिजीटल पुरावे शंकास्पद

**ज्या डिजिटल पुराव्यांच्या आधारे आरोपींना 'यूएपीए'खाली कोठडीत डांबलं, ते पुरावे संशयास्पद आहेत हे दिसत असूनही जामीनसुद्धा दूरच, असं का व्हावं? विविध क्षेत्रांतील जाणकारांचं याबाबत काय मत आहे?**

'आर्सेनल' आणि 'सेंटिनेलवन' यांच्या अहवालांमुळे भीमा-कोरेगाव प्रकरणातील आरोपींच्या विरोधातील डिजिटल पुरावे शंकास्पद ठरत आहेत, तरीदेखील आरोपीला तुरुंगात राहून त्याची किंमत का मोजावी लागावी, असा प्रश्न कुणाच्याही मनात येऊ शकतो. मुळात प्रामुख्याने त्या पुराव्यांमुळेच 'यूएपीए' (बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा) सारख्या कठोर कायद्यांतर्गत खटला उभा राहिल्याने आरोपींना जामीन मिळणंही अवघड झालं आणि त्यांचा हा जाचक प्रवास दुस्तर झाला आहे. म्हणून या संदर्भात विधि क्षेत्रातील आणि सायबर सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञांची मतं खूप महत्त्वाची ठरतात.

पुण्यातील विधि विषयाचे प्राध्यापक नितीश नवसागरे म्हणतात, "'यूएपीए'च्या केसमध्ये जामीन मिळणं जवळपास अशक्य असतं. कारण या कायद्याच्या कलम ४३ नुसार, जर व्यक्तीवरील आरोप प्रथमदर्शनी खरे आहेत असं मानण्यास वाजवी कारण आहे, असं न्यायालयाला



आढळलं, तर आरोपीला जामीन मिळता कामा नये. दुसरं म्हणजे, 'वटाली विरुद्ध एनआयए' या प्रकरणातील अपिलामध्ये २०१९मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय. त्यात न्यायालयानं म्हटलं की, 'सरकारी पक्षाचे पुरावे ग्राह्य धरण्याच्या पात्रतेचे नसले, तरी सरकारपक्षाच्या कागदपत्रावर विसंबून जामीन नाकारला जाऊ शकतो. पुराव्याच्या गुणवत्तेत जाणं म्हणजे, जामिनाच्या टप्प्यावर एक मिनी-ट्रायल आयोजित करण्यासारखं आहे.' म्हणूनच, पोलिसांचे पुरावे सक्षम नसूनही 'भीमा-कोरगाव प्रकरणा'मध्ये व्यक्तींना जामीन मिळत नाहीये."

थोडक्यात, प्रत्यक्ष सुनावणी सुरू होईपर्यंत जामीन मिळण्याची शक्यता कमीच. गेल्या चार वर्षांत सुप्रसिद्ध दलित विचारवंत आनंद तेलतुंबडे यांच्यासह अनेक आरोपींनी वारंवार कनिष्ठ न्यायालय आणि उच्च न्यायालयाकडे जामिनासाठी प्रयत्न केले आहेत. केवळ वरवरा राव आणि सुधा भारद्वाज यांना अंतरिम जामीन मिळालेला आहे पण तोही अनुक्रमे प्रकृतिअस्वास्थ्य आणि जामिनाच्या तांत्रिक कारणामुळे. आर्सेनल' आदींचे अहवाल लक्षात घेता मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अभय ठिपसे थोडी वेगळी मतं मांडतात, "मला वाटतं की, या रिपोर्ट्सची त्यांच्या केसमध्ये मदत व्हायला हवी. न्यायालयानं त्याचा विचार करायला हवा. या स्टेजलाही तज्ज्ञांकडून पुरावा तपासून घेण्याचे अधिकार कोर्टाकडे आहेत. (फौजदारी प्रक्रिया संहितेच्या) कलम ३११अन्वये कोर्टाला कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही व्यक्तीची तपासणी करण्याचा अधिकार आहे. पण ते कोर्टावर अवलंबून आहे. (मात्र) आरोपीचा अधिकार म्हणून पाहता ते बचावपक्षाच्या पुराव्याच्या वेळीच (शक्य) होईल." .

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### चुनाळा येथे पूरपीडित शेतकऱ्याची आत्महत्या

।चंद्रपूर। महाईन्यूज ।

मुसळधार पाऊस व पुराने शेती पूर्णतः नष्ट झाली. यामुळे चुनाळा येथील शेतकरी रवींद्र नारायण मोढे (४५) यांनी बुधवार २७ जुलै रोजी राहत्या घरी दुपारी दीड वाजता गळफास घेऊन आत्महत्या केली. दरम्यान, विरोधी पक्षनेते अजित पवार गुरुवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून शेतकऱ्यांच्या अडचणींकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

रवींद्र यांच्याकडे सात एकर जमीन आहे. त्यांनी सेवा सहकारी संस्था मर्यादित, चुनाळा येथून शेतीकरिता सत्तर हजार रुपयांचे पीक कर्ज उचल करून शेतात कपाशी व सोयाबीन पिकांची पेरणी केली होती. रवींद्र हा एकुलता एक मुलगा असल्याने घरच्या म्हातारे आई-वडील यांचा सांभाळ वर्षभर शेतातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या भरवशावर करीत होता. मात्र, वर्धा नदीला आलेल्या पुरामुळे या एक महिन्यात चार वेळा पुराच्या पाण्याखाली शेतपीक आल्यामुळे त्याचे संपूर्ण पीक उद्ध्वस्त झाले. त्यापूर्वीही दुबार पेरणीच्या संकटाला समोर जावे लागले. अशातच रवींद्र यांच्या आईला विद्युत शॉक लागल्याने त्याही दवाखान्यात उपचार घेत होत्या.

# पोलीस गृहनिर्माण योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही!

## मंत्रिमंडळाची बैठक : पोलिसांच्या घरांची परिस्थिती बदलून टाकण्याचा निर्धार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

।मुंबई ।महाईन्यूज ।

मुंबई आणि उपनगरातील धोकादायक झालेल्या पोलीस वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत लवकरच सर्वंकष धोरण तयार करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली होती. आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली असून पोलिसांच्या घरांची परिस्थिती बदलून टाकण्याचा आमचा निर्धार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. तसेच पोलीस गृहनिर्माण योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नसल्याचं आश्वासन देखील मुख्यमंत्र्यांनी दिलं आहे. पोलीस गृहनिर्माण योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही. तसेच निधी उपलब्ध करण्याकरिता विविध पर्यायांचाही विचार केला जाईल. रेंटल, युएलसीअंतर्गत, इतर शहरांतील पोलीस गृहनिर्माणासाठी आरक्षित भूखंडावरील प्रकल्प यांसह



अगदी एसटी महामंडळाचे भूखंड विकसित करून, त्याबदल्यात घरे उपलब्ध करून घेता येतील अशा पद्धतीने विविध पर्यायांचा विचार करण्यात यावा, असं एकनाथ शिंदे म्हणाले. पोलिसांना घरांची चिंता भासणार नाही असे नियोजन करा. मुंबई, मुंबई महानगर आणि ग्रामीण महाराष्ट्र अशा सर्वच भागातील पोलिसांना पुरेशा संख्येने घरे उपलब्ध होतील यासाठी तत्काळ आणि दीर्घ टप्प्याचे नियोजन करा. पोलिसांच्या घरांची परिस्थिती बदलून टाकण्याचा आमचा निर्धार आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

आपले पोलीस, वारा, पाऊस, सण - उत्सव आणि कोविड सारख्या आव्हानात्मक

**पोलीस गृहनिर्माण योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही. तसेच निधी उपलब्ध करण्याकरिता विविध पर्यायांचाही विचार केला जाईल. रेंटल, युएलसीअंतर्गत, इतर शहरांतील पोलीस गृहनिर्माणासाठी आरक्षित भूखंडावरील प्रकल्प यांसह अगदी एसटी महामंडळाचे भूखंड विकसित करून, त्याबदल्यात घरे उपलब्ध करून घेता येतील अशा पद्धतीने विविध पर्यायांचा विचार करण्यात यावा, असं एकनाथ शिंदे म्हणाले. पोलिसांना घरांची चिंता भासणार नाही असे नियोजन करा. मुंबई, मुंबई महानगर आणि ग्रामीण महाराष्ट्र अशा सर्वच भागातील पोलिसांना पुरेशा संख्येने घरे उपलब्ध होतील यासाठी तत्काळ आणि दीर्घ टप्प्याचे नियोजन करा. पोलिसांच्या घरांची परिस्थिती बदलून टाकण्याचा आमचा निर्धार आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. माझा महाराष्ट्र सैनिक असेल. बाकी सगळे नंतर येतील, असे राज ठाकरे यांनी शनिवारी (२३ जुलै) स्पष्ट केले होते.**

परिस्थितीत आपल्यासाठी उभे असतात. त्यांना घरे उपलब्ध व्हावीत यासाठी विविध पर्याय आणि योजनांचा विचार करा. म्हाडा, सिडको, एसआरए, क्लस्टर योजना यांसह सर्वसमावेशक घरकुल योजना, परवडणारी घरे तसेच एमएमआरडीए आणि खासगी विकासकांच्या माध्यमातून पोलिसांसाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध व्हावीत यासाठी आराखडा तयार करा. पोलिसांकरिता घरे बांधताना ती अत्याधुनिक तंत्रज्ञान, दर्जेदार सामुग्रीचा वापर करण्यात यावा, असं देखील मुख्यमंत्री म्हणाले.

पोलीस वसाहतींचा प्रश्न प्रदीर्घ काळ प्रलंबित असून त्यावर तोडगा काढण्याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत देखील चर्चा झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. मागे याबाबत धोरण निश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता मात्र त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे आता मुख्यमंत्रीपदी बसल्यानंतर या प्रश्नात पुन्हा एकदा लक्ष घालून हा प्रश्न सोडवण्यासाठी सर्वंकष धोरण तयार करण्यात येईल, असं एकनाथ शिंदे म्हणाले होते.

महाविकास आघाडीचं सरकार असताना माजी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी ट्विट करत बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाअंतर्गत माहिती दिली होती. बीडीडी चाळीतील २२५० सेवा निवृत्त पोलीस तसेच पोलिसांना बीडीडी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत ५० लाख रुपयांऐवजी २५ लाख रुपयांमध्ये घर देण्यात येणार आहे, अशी माहिती जितेंद्र आव्हाडांनी दिली होती. त्यामुळे आता शिंदे सरकारने यामध्ये लक्ष केंद्रीत केलं असून हे आश्वासनं पूर्ण होणार का?, हे पाहणं महत्त्वाचं आहे.

# यंदा चाकरमान्यांसाठी गणेशोत्सव सुसाट

## राज्य सरकारकडून टोल माफी जाहीर

।मुंबई ।महाईन्यूज ।

गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या चारकमान्यांसाठी एक दिलासाजनक बातमी आहे. यंदा चाकरमान्यांसाठी गणेशोत्सव सुसाट असणार आहे. कारण पुणे- मुंबईहून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या वाहनांना सरकारने टोलमाफी जाहीर केली आहे. त्यामुळे कोकणात गणेशोत्सवादरम्यान जाताना आता महामार्गावरील टोल नाक्यांवर टोल देण्याची गरज लागणार नाही, पण यासाठी कोकणवासियांना स्थानिक प्रशासनाकडून परवाना असलेले स्टीकर घ्यावे लागणार आहे. टोल माफीच्या निर्णयामुळे सुमारे दहा हजारांहून अधिक वाहनांना फायदा होणार आहे. मात्र स्थानिक प्रशासनाकडून स्टीकर मिळालेल्या कोकणवासियांनाच याचा फायदा होईल.

सरकाराच्या निर्णयानुसार, गणेशोत्सवानिमित्त पुणे आणि कोल्हापूर मार्गे कोकणात जाणाऱ्या आणि गणेश विसर्जनानंतर परताना वाहनांना टोलमाफी देण्यात आली आहे. ही सेवा एस.टी बसेसनाही लागू होण्याची शक्यता आहे. 2018 पासून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि कोल्हापूर मार्गे कोकणात जातना होणारी वाहनांची कोंडी रोखण्यासाठी सरकारने महामार्गावर यंत्रणा ठेवली होती.



यासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांना 'गणेशोत्सव कोकण दर्शन' नावाने एक स्टीकर देण्यात आले होते. यावर्षीही ही यंत्रणा राबवली जाणार असल्याची घोषणा सरकारने केली आहे. मात्र यासाठी स्थानिक पोलीस ठाणे आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडे वाहनांची नोंद करूनच हा स्टीकर मिळणार आहे.

दरवर्षी कोकणात पुण्याहून चिपळूणकडे जाणारी वाहने कराडपासून पाटणमार्गे, तर रत्नागिरी, राजापूरला जाणारी वाहने किणी वाठार वारणामार्गे आंबा घाटातून जात होती, तर देवगड, कणकवलीस जाणारी वाहने कोल्हापूर, गगनबावडामार्गे करूळ घाटातून, तर कुडाळ, मालवण सावंतवाडी, गोव्यास व कर्नाटकात जाणारी वाहने आजरा, आंबोलीमार्गे जात होती. मात्र यंदा किणी (जि. कोल्हापूर) व तासवडे (जि. सातारा) टोल नाक्यांवरूनही सुमारे दहा हजारांहून अधिक वाहने मार्गस्थ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# सशस्त्र दलात डिसेंबर 2023 पर्यंत 84,405 रिक्त पदांची भरती; मोदी सरकारची माहिती!

## शॉर्ट न्यूज »

### राज्यात 2 हजार 138 नव्या कोरोना रुग्णांची नोंद



।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येत होणाऱ्या वाढीच्या पार्श्वभूमीवर सरकार व आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. वाढत्या रुग्णांमुळे नागरिकांच्या लसीकरणातही वाढ करण्यात आली आहे. अशातच बुधवारी राज्यात 2 हजार 138 कोरोनाच्या नव्या कोरोना रुग्णांची भर पडली आहे. सर्वाधिक रुग्ण हे पुण्यात आढळले आहेत. तसेच, राज्यात आज 8 रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. दिलासादायक बाब म्हणजे आज राज्यभरात एकूण 2 हजार 269 रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. तसेच, दिवसभरात 8 जणांचा मृत्यू झाल्याने राज्यातील मृत्यूदर हा 1.84 टक्के इतका झाला. तर आतापर्यंत राज्यामध्ये 78 लाख 77 हजार 288 कोरोनाबाधित बरे होऊन घरी परतले आहेत.

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

डिसेंबर 2023 पर्यंत केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात 84,405 रिक्त पद भरती करणार असल्याचा निर्णय गृहराज्य मंत्री नित्यानंद राय यांनी बुधवारी राज्यसभेत जाहीर केला आहे. भाजप खासदार अनिल अग्रवाल यांच्या लेखी प्रश्नाना उत्तर देताना मंत्री पुढे म्हणाले की, कॉन्स्टेबलची (जनरल ड्युटी) 25,271 पदे भरण्यासाठी यापूर्वीच परीक्षा घेण्यात आली आहे.संसदेत सरकारने माहिती देताना म्हटले की, 6 केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांमध्ये एकूण 84,405 पदे रिक्त आहेत, त्यापैकी केंद्रीय राखीव पोलिस दलात सर्वाधिक 29,985 पदे आहेत. बुधवारी राज्यसभेत ही माहिती देण्यात आली.

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी देखील सांगितले की, सरकारने डिसेंबर 2023 पर्यंत CAPF मध्ये विद्यमान रिक्त पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यमंत्री द्वारे जारी केलेल्या आकडेवारीनुसार, आसाम रायफल्स (9,659), सीमा सुरक्षा दल (19,254), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (10,918), केंद्रीय राखीव पोलीस दल (29,985), तिबेटी सीमा पोलीस (3,187), सशस्त्र सीमा बल (11,402) यासह CAPF मध्ये एकूण 84,405 जागा रिक्त आहेत.



**केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी देखील सांगितले की, सरकारने डिसेंबर 2023 पर्यंत CAPF मध्ये विद्यमान रिक्त पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यमंत्री द्वारे जारी केलेल्या आकडेवारीनुसार, आसाम रायफल्स (9,659), सीमा सुरक्षा दल (19,254), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (10,918), केंद्रीय राखीव पोलीस दल (29,985), तिबेटी सीमा पोलीस (3,187), सशस्त्र सीमा बल (11,402) यासह CAPF मध्ये एकूण 84,405 जागा रिक्त आहेत.**

आसाम रायफल्स, बीएसएफ, सीआयएसएफ, सीआरपीएफ, आयटीबीपी आणि एसएसबी या दलांची एकत्रित मंजूर संख्या 10,05,779 आहे. राज्यमंत्र्यांनी शेअर केलेल्या आकडेवारीचा उल्लेख आहे. राय पुढे म्हणाले की, सरकारने CAPF मधील रिक्त पदे लवकर भरण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी) पदासाठी वार्षिक भरतीची प्रक्रिया आहे, ज्यासाठी कर्मचारी निवड आयोग (एसएससी) सोबत सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे.

राय पुढे म्हणाले की, कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी), सब-इन्स्पेक्टर (जीडी) किंवा सहाय्यक उपनिरीक्षक (कार्यकारी) आणि असिस्टंट कमांडंट (जनरल ड्युटी) या पदांवर भरतीसाठी प्रत्येकी एक नोडल जनरल ड्युटी पदांवर भरतीसाठी समन्वय साधण्यासाठी आहे. दीर्घकालीन आधारावर नियुक्त. सर्व केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि आसाम रायफल्सना नॉन-जनरल ड्युटी कॅडरमधील रिक्त पदांवर कालबद्ध पद्धतीने भरती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पदोन्नतीच्या रिक्त जागा भरण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या (डीपीसी) वेळेवर आयोजित केलेल्या बैठकांचाही मंत्र्यांनी उल्लेख केला.

# श्रीलंकेतील स्थितीवर अमेरिकेचा चीनवर ठपका!

## श्रीलंकेत सध्या उद्भवलेल्या परिस्थितीवरून यूएसएडने थेट चीनवर ठपका

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

श्रीलंकेत सध्या उद्भवलेल्या परिस्थितीवरून यूएसएडने थेट चीनवर ठपका ठेवतानाच भारताचे कौतुक केले आहे. आंतराष्ट्रीय स्तरावर मदत देणारी अमेरिका सरकारची यूएसएड ही एजन्सी आहे. या एजन्सीच्या प्रमुख सामंथा पॉवर या तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आल्या आहेत.

दिल्ली आयआयटीमध्ये एका कार्यक्रमात मार्गदर्शन करताना, चीनच्या धोरणांमुळेच श्रीलंकेवर आर्थिक संकट आले असल्याचे सामंथा पॉवर यांनी सांगितले. याशिवाय, भ्रष्टाचार, कोरोना आणि त्यामुळे पर्यटनावर आलेले निर्बंध, दहशतवाद आणि कृषिविषयक अयोग्य निर्णय यामुळे देखील श्रीलंकेवर ही स्थिती ओढावली आहे, असे त्या म्हणाल्या.

तर, भारताने आपल्या शेजारी राष्ट्राला वाचविण्यासाठी अतिशय शीघ्र गतीने मदतकार्य केले आहे. 'वसुधैव कुटुंबकम'वर विश्वास असलेल्या भारताची जगात कुठेही दुःख नसावे, अशी सदिच्छा बाळगतो. ८० आणि ९०च्या दशकात आर्थिक अडचण असतानाही भारताकडून दुसऱ्या गरीब देशांना आर्थिक मदत दिली गेली आहे, असे कौतुक त्यांनी केले.

समाजात वाढत असलेली तेढ आणि दुही माजवणाऱ्यांवर नियंत्रण आणण्याची गरज आहे. भारत आणि अमेरिकेत राहणाऱ्या काही शक्ती दुही माजवण्याचा प्रयत्न करत आहेत. या शक्ती धर्म-धर्मात, पंथा-पथांच संघर्ष घडवून आणू इच्छितात, असे सांगून त्या म्हणाल्या, केवळ हिंद प्रशांत क्षेत्रातच नव्हे तर, संपूर्ण जगातील एक लीडर म्हणून अमेरिका भारताकडे पाहतो आणि त्याच दृष्टीने उभय देशांमधील संबंधांमध्ये वृद्धी होत आहे.

**भारताने आपल्या शेजारी राष्ट्राला वाचविण्यासाठी अतिशय शीघ्र गतीने मदतकार्य केले आहे. 'वसुधैव कुटुंबकम'वर विश्वास असलेल्या भारताची जगात कुठेही दुःख नसावे, अशी सदिच्छा बाळगतो. ८० आणि ९०च्या दशकात आर्थिक अडचण असतानाही भारताकडून दुसऱ्या गरीब देशांना आर्थिक मदत दिली गेली आहे, असे कौतुक त्यांनी केले.**



## ६ वर्षाच्या नात्यानंतर दिशा पटानी आणि टायगर श्रॉफचा झाला ब्रेकअप

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ आणि अभिनेत्री दिशा पटानी यांनी त्यांच्या नात्याला पूर्णविराम लावला असल्याची बातमी समोर आली आहे. मागील ६ वर्षाच्या नात्यानंतर दिशा आणि टायगरने ब्रेकअप केला असल्याची चर्चा सर्वत्र सुरू झाली आहे. आता कपल म्हणून दिशा




आणि टायगर एकत्र नसतील. मात्र त्यांच्या ब्रेकअपची वार्ता कळताच त्यांच्या चाहत्यांमध्ये नाराजी पसरली आहे. दरम्यान, सोशल मीडियावर याबाबच चर्चा सुरू झाल्या असून चाहते ब्रेकअपबाबत प्रश्न उपस्थित करू लागले आहेत.

दिशा आणि टायगरच्या ब्रेकअप मागचे कारण

टायगर श्रॉफ आणि दिशा पटानी बॉलिवूडमधील प्रसिद्ध कपलपैकी एक आहेत. यांना अनेकदा एकत्र स्पॉट केले जाते. मीडिया रिपोर्ट्सच्या माहितीनुसार, गेल्या अनेक दिवसांपासून टायगर आणि दिशाच्या नात्यामध्ये अनेक चढ-उतार येत होते. परंतु ही गोष्ट कधीही त्यांनी जगजाहिर केली नाही. अजूनही त्यांनी ब्रेकअप का केला यामागचं कारण स्पष्ट झालं नाही. परंतु आता हे दोघं आपापलं स्वतंत्र आयुष्य जगत आहेत. टायगरच्या एका मित्राने त्यांचा ब्रेकअप झाला असल्याचं सांगितलं.

## कंगनाच्या 'इमर्जन्सी'मध्ये मराठमोळा श्रेयस तळपदे साकारणार अटल बिहारी वाजपेयींची भूमिका

बॉलिवूड अभिनेत्री कंगना रनौतच्या बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित 'इमरजेंसी' चित्रपटाच्या पोस्टरने काही दिवसांपूर्वी चांगलीच धमाल उडवली होती. कंगनाचा इंदिरा गांधींच्या भूमिकेतील लूक आणि अभिनय पाहून अनेकांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. कंगनाचा लूक रिव्हील झाला होता. कंगनानंतर 'इमरजेंसी' मधून जय प्रकाश नारायण यांची भूमिका साकारणारे अभिनेते अनुपम खेर यांनी सर्वांना आश्चर्यचकित केले होते. दरम्यान आता, या चित्रपटात अटल बिहारी वाजपेयी यांची महत्वाची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्याचा लूक रिव्हिल करण्यात आला आहे. कंगनाच्या इमरजेंसी चित्रपटात अटल





बिहारी वाजपेयी ही भूमिका मराठमोळा श्रेयस तळपदे साकारणार असल्याचं समोर आलं आहे. माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वायपेयी या महत्वाच्या भूमिकेसाठी अभिनेता श्रेयस तळपदे याची निवड करण्यात आली आहे. नुकताच श्रेयसचा फर्स्ट लूक शेअर करण्यात आला. भारत रत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या भूमिकेत असलेल्या श्रेयस तळपदेला पाहून सर्वचजण आश्चर्यचकित झाले आहेत. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी यांच्या तरूण पणाची एक झलक सुद्धा दिसत आहे. श्रेयसचा हा लूक शेअर करत कंगनाने लिहिलं की, एक खरा राष्ट्रवादी, ज्यांना देशाबद्दल प्रेम होते. जे इमरजेंसीच्या वेळी एक युवा नेते होते.

'इमरजेंसी' चित्रपटामुळे श्रेयस तळपदे मिळणार नवी ओळख

अटल बिहारी वाजपेयी यांच्या भूमिकेत श्रेयसला पाहून लोक खूप पसंत करत आहेत. सोशल मीडियावर चाहते श्रेयसचं खूप कौतुक करत आहेत. चाहत्यांच्या मते, इमरजेंसीची स्टार कास्ट खूप उत्तम आहे. आत्तापर्यंत श्रेयसने काही हिंदी चित्रपटांमध्ये छोट्या-मोठ्या भूमिका केलेल्या आहेत. तसेच मराठी चित्रपट आणि मालिकांमध्ये काम केलेलं आहे.

## राकेश आणि शमिता यांनी दिला नात्याला पूर्णविराम



बिग बॉस ओटीटी फेम शमिता शेट्टी आणि अभिनेता राकेश बापट यांच्या जोडीचे अनेक चाहते आहेत. मात्र मागील अनेक दिवसांपासून यांच्या नात्याबाबत वेगवेगळ्या बातम्या वारंवार समोर येत होत्या. दरम्यान, राकेश आणि शमितानेही या सर्व चर्चेला कायमचा पूर्णविराम लावलेला आहे. नुकतीच या दोघांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर एक स्टोरी शेअर करत आपल्या ब्रेकअपची घोषणा केली. ही बातमी कळताच त्यांचे सर्व चाहते नाराज झाले आहेत. शमिता आणि राकेश होणार वेगळे शमिता शेट्टी आणि राकेश बापटची रोमॅंटिक लवस्टोरी करण जौहरच्या बिग बॉस ओटीटी या रियालिटी शोमध्ये सुरू झाली. यावेळी ते पहिल्यांदा एकमेकांचे मित्र झाले आणि हळूहळू यांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. हा शो संपल्यानंतर देखील दोघं बऱ्याचदा एकमेकांसोबत असायचे. सोशल मीडियावर देखील दोघांचे फोटो शेअर करायचे. मात्र आता त्यांनी एकमेकांपासून वेगळं व्हायचा निर्णय घेतला आहे. याबाबत खुलासा करत त्यांनी आपल्या इंस्टाग्रामद्वारे चाहत्यांना याबाबत माहिती दिली.

## 'तुम्हाला घरचंच जेवण लागतं;' चंद्रकांत पाटलांच्या 'त्या' सल्ल्यावर सुप्रिया सुळेंचं मजेशीर उत्तर

'बस बाई बस' कार्यक्रमात राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी हजेरी लावली होती. सूत्रसंचालक सुबोध भावे सोबत सुप्रिया सुळेंनी राजकारणासोबतच इतरही विषयांवर मनोकळ्या गप्पा मारल्या. याच कार्यक्रमादरम्यान चंद्रकांत पाटलांनी घरी काम कारण्याच्या दिलेल्या सल्ल्यावरही मजेशीर प्रतिकिया दिली.

'बस बाई बस' हा कार्यक्रम नुकताच झी मराठीवर सूर झाला आहे. महिलांसाठी विशेष असलेल्या या कार्यक्रमाची सध्या सोशल मीडियावर सुद्धा चर्चा सुरु आहे. अभिनेता सुबोध भावे या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करत आहे. विविध क्षेत्रातील कतृत्ववान महिला या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचा पहिला भाग नुकताच





प्रसारित झाला आहे. या भागात राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी हजेरी लावली होती. कार्यक्रमाचा सूत्रसंचालक सुबोध भावे सोबत सुप्रिया सुळेंनी राजकारणासोबतच इतरही विषयांवर मनोकळ्या गप्पा मारल्या. याच कार्यक्रमादरम्यान चंद्रकांत पाटलांनी घरी काम कारण्याच्या दिलेल्या सल्ल्यावरही मजेशीर प्रतिकिया दिली.

खासदार सुप्रिया सुळे यांच्या भाकरी भाजतानाच्या व्हिडीओ वरून आणि चंद्रकांत पाटलांच्या सल्ल्यावर या दोन्ही व्हिडीओची आठवण करून सुबोध भावे यावर काय वाटतं? असा प्रश्न सुप्रिया सुळेंनी खूपच मजेशीर उत्तर दिले. हा व्हिडीओ सुद्धा खूप चर्चेत आला आहे. याच प्रश्नाचं उत्तर देत सुप्रिया सुळे म्हणाल्या, की "मला खरं तर त्यांच्या या सल्ल्याचं फार काही वाईट वाटलं नाही कारण मी एक महिला आहे आणि एक गृहिणी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. घरात स्वयंपाक करण्याला मी कमीपणा समजतच नाही. कारण दिवसभर तुम्ही कितीही काम केलं तरीही जेव्हा घरी जाता तेव्हा तुम्हाला घरचंच जेवण लागतं. इथे सेटवर जेव्हा तुम्ही जेवता तेव्हाही पहिला घास घेतल्यानंतर तुम्हाला घरच्या जेवणाची आठवण येते. त्यामुळे घरच्या जेवणाला पर्याय नाही."

## तापसी पन्नू भारतीय सिनेमा क्षेत्रातील सर्वात वैविध्यपूर्ण अभिनेत्री

**'नाम शबाना'मधून केवळ सात मिनिटांत स्वतःची छाप पाडणाऱ्या तापसीनं नंतर मागे वळून पाहिलंच नाही आणि ती चाहत्यांना एकापेक्षा एक दर्जेदार सिनेमे देत राहिली.**



तापसी पन्नू ही सर्वात दमदार अभिनेत्रींपैकी एक असून योग्य निवडीच्या जोरावर तिने भारतीय सिनेमा क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. तिच्या सिनेमांमधले भावनांचे चित्रण प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणारे असते. तापसीने दाक्षिणात्य सिनेमांमधून आपल्या करियरची सुरुवात केली आणि नुकतीच तिनं या क्षेत्रात 12 वर्षे पूर्ण केली. 'नाम शबाना'मधून केवळ सात मिनिटांत स्वतःची छाप पाडणाऱ्या तापसीनं नंतर मागे वळून पाहिलंच नाही आणि ती चाहत्यांना एकापेक्षा एक दर्जेदार सिनेमे देत राहिली. 'रश्मी रॉकेट'मध्ये एखाद्या खेळाडूप्रमाणे कमावलेल्या शरीरापासून तिच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या शाब्बास मिथू सिनेमात क्रिकेटचे तंत्र नेमकेपणाने सादर करण्यापर्यंत तिनं कायमच आपल्या गुणवत्तेची चमक दाखवली. पॅन भारताची स्टार म्हणून ओळखली जाणारी तापसी आपल्या व्यक्तिरेखेला अक्षरशः जिवंत करण्यासाठी प्रसिद्ध आहे.

## शॉर्ट न्यूज »

### महिला विश्वचषक भारतात होणार; आयसीसीची माहिती



नवी दिल्ली। महाईन्यूज

महिला क्रिकेटच्या आगामी विश्वचषक सामन्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियामक मंडळाने (आयसीसी) वेळापत्रक जाहीर केले असून, त्यानंतर २०२५ साली होणाऱ्या महिला विश्वचषकाबाबत माहिती देणयात आली आहे. त्यानुसार, महिला विश्वचषक भारतात होणार असल्याचे समजते. बीसीसीआय सचिव जय शहा आणि अध्यक्ष सौरव गांगुली यांनीही याबाबत माहिती दिली आहे. तसेच, बीसीसीआयने ट्वीट केले आहे."आयसीसीने २०२५ सालच्या विश्वचषकाचे यजमानपद भारताला दिल्याने फार आनंद झाला आहे. त्यामुळे कोणतीच कसर सोडणार नाही. अविस्मरणीय अशी स्पर्धा घडवून दाखवू. शिवाय, महिला क्रिकेटसाठी बीसीसीआय कायम अग्रेसर राहिले आहे. सर्व सोयीसुविधांच्या जोरावर एक यशस्वी स्पर्धा आम्ही पार पाडू", असे बीसीसीआय सचिव जय शहा यांनी म्हटले.

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पी. व्ही. सिंधूला दुसऱ्यांदा ध्वजवाहकाचा मान!

**नीरजला दुखापत झाल्यामुळे तो या स्पर्धेत खेळणार नाही. त्यामुळे यंदाच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पी. व्ही. सिंधूला हा मान मिळाला आहे.**

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।





ब्रिटनमध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पी. व्ही. सिंधूला ध्वजवाहकाचा मान मिळाला आहे. यंदा सुरु होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी ध्वजवाहकाचा मान हा नीरज चोप्राला देण्यात आला होता. पण नीरजला दुखापत झाल्यामुळे तो या स्पर्धेत खेळणार नाही. त्यामुळे यंदाच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पी. व्ही. सिंधूला हा मान मिळाला आहे.

पी. व्ही. सिंधूला दुसऱ्यांदा ध्वजवाहकाचा मान मिळाला आहे. याआधी २०१८ साली झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी तिला हा सन्मान देण्यात आला होता. सिंधू ही जागतिक स्तरावर भारताची सर्वात यशस्वी बॅडमिंटन खेळाडू ठरली आहे.

दोन ऑलिम्पिक पदकांबरोबरच तिच्या नावावर मानाच्या स्पर्धेतील जेतेपदं आहेत.

नीरज चोप्रा या स्पर्धेत खेळू शकणार नसल्यामुळे आता हा मान सिंधूला मिळणार आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात सिंधू भारताचा तिरंगा घेऊन मैदानात उतरणार आहे. सिंधूने काही दिवसांपूर्वी सिंगापूर बॅडमिंटन स्पर्धा जिंकली होती.

कॉमनवेल्थ गेम्स २०२२ स्पर्धेला गुरूवार २८ जुलैपासून सुरवात होणार आहे. इंग्लंडच्या बर्मिंगहॅम येथे ही स्पर्ध खेळवली जाणार आहेत. या स्पर्धेसाठी भारतीय संघ आधीच बर्मिंगहॅमला पोहोचला आहे. परंतु, यंदा अनेक स्टार खेळाडू या स्पर्धेला मुकणार आहेत. त्यामुळे भारतीय चाहत्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यानुसार, स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा, विश्वविजेती मेरी कोम आणि सायना नेहवाल यांच्यासह अनेक स्टार खेळाडू यावेळी राष्ट्रकुलमध्ये आपली चमकदार कामिगीरी दाखवताना दिसणार नाहीत. हे सर्व खेळाडू वेगवेगळ्या कारणांमुळे बाहेर पडले आहेत.

# भारताला मोठा धक्का

## दोन क्रिकेटपटूंना कोरोनाची लागण



।पोर्ट ऑफ स्पेन । महाईन्यूज ।

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा काही तासांवरच येऊन ठेपली आहे. पण ही स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच दोन क्रिकेटपटूंना कोरोनाची लागण झाली असून भारताला मोठा धक्का बसलाय. या दोन खेळाडूंची नावं मात्र बीसीसीआयने सांगितलेली नाहीयेत. भारतीय संघ रविवारी सकाळी बर्मिंगहॅमला दाखल झाला आहे. आता संघ या दोन खेळाडूंविनाच स्पर्धेतील ऑस्ट्रेलियाविरुद्ध सलामीची लढत खेळणार आहे. तसेच हा सामना शुक्रवारी खेळवण्यात येणार आहे.

भारतीय संघाची दुसरी लढत ३१ जुलै रोजी पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. तर तिसरी लढत बार्बाडोसविरुद्ध होणार आहे. या स्पर्धेतील सर्व लढती एजबॅस्टन येथे होणार आहे. ६ ऑगस्टला पहिला आणि दुसरा उपांत्य सामना खेळवण्यात येणार आहे. त्याचसोबतच ७ ऑगस्टला कांस्यपदकाची लढत होणार आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेसाठी ३२२ सदस्य भारतीय संघ आधीच जाहीर करण्यात आली आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (IOA) या संघात २१५ खेळाडूंचा समावेश केला आहे, तर १०७ अधिकारी आणि सहाय्यक कर्मचारी असणार आहेत. दरम्यान, राष्ट्रकुल स्पर्धेत हरमनप्रीत कौर संघाचे नेतृत्व करेल तर स्मृती मंधाना उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे. सध्या कोरोना झालेल्या खेळाडूंना पाच दिवस विलगीकरणात ठेवण्यात येते आणि त्यानंतर त्यांची पुन्हा एकदा कोरोना चाचणी घेण्यात येते. या चाचणीमध्ये जर खेळाडू कोरोना निगेटीव्ह सापडले तर त्यांची फिटनेस चाचणी घेण्यात येते. या चाचणीमध्ये पास झाल्यावरच त्यांना संघात दाखल करण्यात येऊ शकते.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही